# वसई-विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.२४/०९/२०२४

**<u>मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्याचे महानगरपालिकेमार्फत आवाहन</u>**

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील जेष्ठ नागरिकांना त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक ती सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणे करीता तसेच त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्य शासनामार्फत **“मुख्यमंत्री वयोश्री योजना”** सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आवश्यक ती सहाय्य साधने/उपकरणे (चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डींग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, कंबर बेल्ट, सर्व्हायकल कॉलर इ.) खरेदी करण्याकरिता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ.द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरीता एकवेळ एकरकमी रु.३,०००/- पात्र लाभार्थ्यांना बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात लाभ देण्यात येईल.

**<u>योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :</u>**

- सदर योजने अंतर्गत लाभार्थी व्यक्ती दि.३१/१२/२०२३ अखेर पर्यंत ६५ वर्षे पूर्ण केलेले असावे व त्यांच्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
- जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बिपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करू शकतो.
- लाभार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न रु.२ लाखाच्या आत असावे. याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे.

**<u>योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :</u>**

- आधारकार्ड (स्व-साक्षांकित प्रत)
- मतदान कार्ड / वयाबाबतचा पुरावा (स्व-साक्षांकित प्रत)
- उत्पन्नाबाबतचे विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र
- पासपोर्ट आकाराचे दोन फोटो
- यापूर्वी लाभ न घेतलेले विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र
- अर्जदाराचा आधार संलग्न असलेल्या राष्ट्रीयकृत बँक पासबुकची स्व-साक्षांकित प्रत
- सक्षम आरोग्य अधिकारी (मनपा/न.पा./इ.) यांचेकडील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र

मुख्यमंत्री वयोश्री योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगपालिकेने ७९६४ इतके अर्ज भरण्यात आलेले असून निम्म्यापेक्षा जास्त अर्ज समाज कल्याण कार्यालय, पालघर येथे पाठविण्यात आलेले आहेत.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी जवळच्या **<u>महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रभाग समिती कार्यालय</u>** येथे अर्ज करावा व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**